# राष्ट्रीय लोक अदालत

## दिवाणी व फौजदारी न्यायालय मालवण

(विधी सेवा प्राधिकरण कायदा, १९८७ (केंद्रीय कायदा) चे कलम १९ नुसार आयोजीत)

**निशाणी क्रमांक–२२**

प्रकरण क्रमांकः – नियमीत दिवाणी मुकदमा क्रमांक २२/२०२६

वादीचे नाव – **श्री. सुहास विश्वनाथ सामंत.**
वय सु. ७५ वर्षे, धंदा – शेती व व्यापार,
रा. घर नं. ३०३, मुंबई–गोवा हायवे, हॉटेल क्षणभर विश्रांती जवळ, मु. चिंचवण, पो. शिरढोण, ता. पनवेल, जि. रायगड, पिनकोड ४१०२२१

प्रतिवादीचे नाव – १) **श्री. रमेश दशरथ हुर्णे.**
वय सु. ६२ वर्षे, धंदा – शेती,
रा. घर नं. ३३०, मु. पो. आंबेरी, हुर्णेवाडी, ता. मालवण,जि. सिंधुदुर्ग,
पिनकोड ४१६६०५

२) **श्री. संतोष दशरथ हुर्णे.**
वय सु. ५७ वर्षे, धंदा – नोकरी,
रा. अे ४०९, शुभम मोनोलीथ, आमराई, आमराई पोलीस चौकी जवळ, विजयनगर, कल्याण (पूर्व),जि.ठाणे,पिनकोड ४२१३०६.

३) **श्रीम. अन्नपुर्णा गोपाळ हुर्णे.**
वय सु. ६१ वर्षे, धंदा – गृहिणी,
रा.घर नं.१२६,मु.पो.आंबेरी,हुर्णेवाडी,
ता.मालवण,जि.सिंधुदुर्ग,पिनकोड ४१६६०५.

४) **श्री. सागर गोपाळ हुर्णे.**
वय सु. ३४ वर्षे, धंदा – नोकरी,
रा. रुम.नं.१३५, एच वॉर्ड, बी. एम. सी.
कॉलनी, जनरल अे. के. व्ही. मार्ग, दिंडोशी,
गोरेगांव (पूर्व),मुंबई, पिनकोड ४०००६५.

५) **कविता गोपाळ हुर्णे.**
**लग्नानंतर सौ. सावी समीर नांदोसकर**
वय सु. ३३ वर्षे, धंदा – गृहिणी,
रा. ७/४०३, कोहिनूर मिल चाळ, महात्मा
ज्योतीबा फुले रोड, शारदा सिनेमाजवळ,
नायगांव, दादर(पूर्व),मुंबई,
पिनकोड ४०००१४.

६) **श्रीम. विषया विलास हुर्णे.**
वय सु. ५५ वर्षे, धंदा – गृहिणी,
रा. घर नं. १२६, मु. पो. आंबेरी, हुर्णेवाडी,
ता.मालवण,जि.सिंधुदुर्ग,पिनकोड४१६६०५

..३..

७) **श्री. विशाल विलास हुर्णे.**
वय सु. ३१ वर्षे, धंदा – नोकरी,
रा. ३, तुळशीराम जोशी चाळ,
जुनी डोंबिवली रोड, नेमाडे गल्ली, विष्णू
नगर, डोंबिवली (पश्चिम) ता. कल्याण,
जि. ठाणे, पिनकोड ४२१२०२

८) **मयुरी विलास हुर्णे.**
**लग्नानंतर सौ. मयुरी गणेश परुळेकर.**
वय सु. ३० वर्षे, धंदा – नोकरी,
रा. फ्लॅट नंबर ३०३, पद्म प्रभा को. ऑप.
हाऊसिंग सोसायटी लिमीटेड, यादव नगर,
शिरगांव, बदलापूर (पूर्व), पोष्ट कुलगांव,
जि. ठाणे, पिनकोड ४२१५०३.

९) **श्री. शंकर अंकुश कुडाळकर.**
वय सु. ४४ वर्षे, धंदा – नोकरी,
रा. रुम.नं.१७, सुंदर निवास बिल्डींग,
तिसरा मजला, आर. बी. आय. कॉलनी,
गिरीजा माता मंदिर नजीक, जुनी डोंबिवली,
डोंबिवली (पश्चिम), कल्याण, जि. ठाणे,
पिनकोड ४२१२०१.

१०) **श्री. भुषण अंकुश कुडाळकर.**
वय सु. ४१ वर्षे, धंदा – शेती,
रा. घर नं. ६८४, काळसे–बागवाडी,
ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग,
पिनकोड ४१६६०५

११) **श्री. परेश अंकुश कुडाळकर.**
वय सु. ३६ वर्षे, धंदा – नोकरी,
रा. सुंदर निवास बिल्डींग, तिसरा मजला,
आर. बी. आय. कॉलनी, गिरीजा माता मंदिर
नजीक, जुनी डोंबिवली, डोंबिवली (पश्चिम),
कल्याण,जि. ठाणे, पिनकोड ४२१२०१.
**प्रतिवादी क्र. १ स्वत:करीता आणि प्रतिवादी**
**क्र. २ ते ११ यांचे कुलमुखत्यारी म्हणुन**

१२) **श्रीम. सुलोचना वामन हुर्णे.**
वय सु. ७० वर्षे, धंदा – गृहिणी,
रा. मु. पो. आंबेरी, हुर्णेवाडी, ता. मालवण,
जि. सिंधुदुर्ग, पिनकोड ४१६६०५.

१३) **श्री. प्रकाश वामन हुर्णे.**
वय सु. ५५ वर्षे, धंदा – नोकरी,
रा. शिरढोण, ता. पनवेल, जि. रायगड,
पिनकोड ४१०२२१.

१४) **श्री. नारायण वामन हुर्णे.**
वय सु. ५१ वर्षे, धंदा – नोकरी,
रा. जय भवानी मित्र मंडळ, आझाद रोड,
गुंदवली गावठाण, रुम नं.१०८८,
सिताराम आचार्य चाळ, गल्ली नं.२, अंधेरी
(पूर्व), मुंबई, पिनकोड ४०००६९

१५) **सौ. रंजना रघुनाथ करलकर**
**पूर्वाश्रमिची मालिनी वामन हुर्णे.**
वय सु. ५८ वर्षे, धंदा –गृहिणी,
रा. १८७, अनाशांतवाडी, कवठी, ता.
कुडाळ,जि. सिंधुदुर्ग, पिनकोड ४१६५२४

१६) **सौ. स्वप्नाली सत्यविजय पराडकर**
**पूर्वाश्रमिची मंगला वामन हुर्णे.**
वय सु. ४५ वर्षे, धंदा – गृहिणी,
रा. बी–२, सुरेश कॉम्प्लेक्स, जिमखाना रोड,
हनुमान मंदिराजवळ, सागरली, टिळकनगर,
डोंबिवली (पूर्व), ता. कल्याण, जि. ठाणे,
पिनकोड ४२१२०१

**प्रतिवादी क्र.१४ स्वत:करीता आणि प्रतिवादी क्र.१२,१३,१५,१६ यांचे कुलमुखत्यारी म्हणुन**

न्यायालयाचे नावः – दिवाणी न्यायालय (क.स्तर), मालवण

(१) न्यायीक अधिकारी यांचे नांव – श्री. एम.के.फकिह,
अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती तथा
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), मालवण

(२) पॅनल सदस्यः – ॲड. श्री. सुमित काशिनाथ जाधव,
पॅनल लॉयर

## अवार्ड

दोन्ही पक्षांमधील वाद सामंजस्याने मिटवण्यासाठी प्रस्तुतचे प्रकरण हे आज रोजी राष्ट्रीय लोक अदालत समोर सादर करण्यात आले आहे. उभय पक्षकारांनी या लोक अदालत समक्ष तडजोड केली आहे आणि त्यांच्या तडजोडीच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेतः

१) वादीने प्रस्तुतचा दावा हा दाव्यातील नमुद दावा जमीन मिळकतींच्या सरस निरस वाटपासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यातील वादी आणि प्रतिवादी क्रमांक १ ते १६ यांच्या दरम्याने सामोपचाराने तडजोड होऊन प्रस्तुत अवॉर्डमध्ये आणि निशाणी क्र. २१ येथील संयुक्त तडजोड पुरशीसमध्ये नमुद केल्याप्रमाणे आणि पुरशीस सोबत जोडलेल्या समजुतीच्या वाटप नकाशाप्रमाणे दावा मिळकतींचे वाटप करुन घेण्याचे ठरलेले आहे. त्याकारणे आता वादी आणि प्रतिवादी क्रमांक १ ते १६ यांच्यामध्ये आता कोणताही वाद राहीलेला नाही.

२) गाव मौजे आंबेरी, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग येथील या दाव्याचा विषय असलेल्या दावा जमीन मिळकतींचे सर्व्हे वर्णन पुढीलप्रमाणे –

| अ.क्र. | भुमापन क्रमांक | उपविभाग | क्षेत्र<br>हे. आर. चौ. मी. | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | ४०<br>(जुना भुमापन क्रमांक १७) | ५ | ०–२०–००<br>ख.०–०४–००<br>०–२४–००<br>सदर मिळकती मधील वादी यांनी नोंदणीकृत खरेदीखताने गोविंद शंकर हुर्णे यांचे हिश्याचे खरेदी केलेले क्षेत्र<br>०–०६–६६<br>ख.०–०१–३३<br>०–०७–९९ | ०.०६ |
| २ | ४०<br>(जुना भुमापन क्रमांक १७) | १०/१ | ०–०६–००<br>ख.०–०२–००<br>०–०८–००<br>सदर मिळकती मधील वादी यांनी नोंदणीकृत खरेदीखताने गोविंद शंकर हुर्णे यांचे हिश्याचे खरेदी केलेले क्षेत्र<br>०–०२–००<br>ख.०–००–६६<br>०–०२–६६ | ०.०३ |

| अ.क्र. | भुमापन क्रमांक | उपविभाग | क्षेत्र<br>हे. आर. चौ. मी. | आकार |
|---|---|---|---|---|
| ३ | ४०<br>(जुना भुमापन क्रमांक १७) | १०/२ | ०-०६-००<br>ख.०-०२-००<br>०-०८-००<br>सदर मिळकती मधील वादी यांनी नोंदणीकृत खरेदीखताने गोविंद शंकर हुर्णे यांचे हिश्याचे खरेदी केलेले क्षेत्र<br>०-०२-००<br>ख.०-००-६६<br>०-०२-६६ | ०.०३ |

वर नमुद सर्व दावा मिळकती या एकमेकांस लागुन आहे. दावा मिळकत भुमापन क्र.४० उपविभाग १०/१ आणि भुमापन क्र. ४० उपविभाग १०/२ या जमीन मिळकतींचे सातबारा उतारे स्वतंत्र असले तरी त्यांचे स्वतंत्र नकाशे अस्तित्वात आलेले नाहीत. दावा मिळकत भुमापन क्र.४० उपविभाग १०/१ आणि भुमापन क्र. ४० उपविभाग १०/२ या दोन्ही मिळकतीचे मुळ सर्व्हे वर्णन भुमापन क्र. ४० उपविभाग १० असे आहे.

३) दावा जमीन मिळकती या पूर्वी कै.दशरथ गोपाळ हुर्णे, कै.वामन नारायण हुर्णे व श्री.गोविंद शंकर हुर्णे यांच्या प्रत्येकी ५ आणे ४ पै. हिश्श्याने म्हणजेच प्रत्येकी १/३ हिश्श्याने मालकी कब्जा वहिवाटीच्या होत्या. वादी यानी वर नमुद सर्व दावा मिळकतींमधील श्री.गोविंद शंकर हुर्णे यांचे मालकी हक्काचे ५ आणे ४ पै.

हिश्श्याचे क्षेत्र म्हणजेच १/३ मालकी हक्काचे क्षेत्र दि.२९/०९/२००९ रोजी मालवण येथील मा. दुय्यम निबंधक श्रेणी १ यांच्या कार्यालयात नोंदविलेल्या दस्त क्र. ९५७ या खरेदीखतान्वये खरेदी केलेले आहे. दावा जमीन मिळकतींमध्ये कै. दशरथ गोपाळ हुर्णे यांचे मृत्यूपश्चात वारसा हक्काने प्रतिवादी क्र.१ ते ११ यांचा एकत्रात १/३ हिस्सा आहे. तसेच दावा जमीन मिळकतींमध्ये कै. वामन नारायण हुर्णे यांचे मृत्यूपश्चात वारसा हक्काने प्रतिवादी क्र. १२ ते १६ यांचा एकत्रात १/३ हिस्सा आहे. सदरील बाब प्रतिवादी क्रमांक १ ते १६ यांस मान्य आहे.

परंतु वर नमुद दावा जमीन मिळकतींचे वाटप करीत असताना प्रत्येक दावा मिळकतीतील वादीने नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी केलेले क्षेत्र आणि प्रतिवादींचे वर नमुद हिश्श्यानूसार असलेले क्षेत्र हे त्या त्या मिळकतीचे वाटप करुन वादीस–प्रतिवादींस दिल्यास मिळकत उपभोगणे वादी आणि प्रतिवादी नं.१ ते १६ यांस सोईचे ठरणारे नाही. म्हणुन वादीचे खरेदीखतास कोणतिही बाधा न आणता वादीने वर नमुद सर्व मिळकतीपैकी नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी केलेले एकूण क्षेत्र ०–१३–३१ खरेदी केलेले असले तरी प्रस्तुत कामी वादी आणि प्रतिवादींमध्ये झालेल्या तडजोडीनूसार ०–१३–३४ हे. आर. चौ. मी. एवढे क्षेत्र एकाच ठिकाणी सलग म्हणजेच वादीस भुमापन क्र.४० उपविभाग १०/१ आणि भुमापन क्र.४० उपविभाग १०/२ म्हणजेच मूळ सर्व्हे वर्णन भुमापन क्र.४० उपविभाग १० या मिळकतीत दक्षिण दिशेकडील अवार्ड सोबतच्या आणि निशाणी क्र. २१ येथील पुरशीस सोबत जाडलेल्या तडजोडीचे वाटप दर्शविणाऱ्या नकाशामध्ये इंग्रजी "C" अक्षराने दर्शविलेला भाग हा वादीच्या सद्यस्थितीस असलेल्या वहिवाटीप्रमाणे –

वादीचे हिश्श्यास/वाटपात देवविणेत यावा आहे असे वादी आणि प्रतिवादी क्र.१ ते १६ यांचेत सामोपचाराने तडजोड होऊन ठरलेले आहे.

तर प्रतिवादी क्र.१ ते ११ यांना तिनही दावा मिळकतीचे स्वतंत्र वाटप करुन प्रत्येक मिळकतीतील त्यांचे एकत्रातील १/३ हिश्श्याचे असलेले क्षेत्र वाटपात दिले गेल्यास ते उपभोगणे कठीण होणारे आहे. म्हणुन प्रतिवादी क्र.१ ते ११ यांना सर्व मिळकतीतील त्यांचे हिश्श्याचे वाटप करुन देण्याऐवजी प्रतिवादी क्र.१ ते ११ यांस त्यांचे तिनही मिळकतीतील मिळुन १/३ हिश्श्याचे क्षेत्र ०–१३–३३ हे. आर. चौ. मी. हे प्रतिवादी क्र. १ ते ११ यांची पूर्वीपासून वहिवाट असलेल्या ठिकाणी म्हणजेच दावा मिळकत भुमापन क्र.४० उपविभाग ५ या मिळकतीत उत्तर दिशेकडील अवार्ड सोबतच्या आणि निशाणी क्र. २१ सोबत जाडलेल्या तडजोडीचे वाटप दर्शविणाऱ्या नकाशामध्ये इंग्रजी “A” अक्षराने दर्शविलेला भाग हा प्रतिवादी क्र. १ ते ११ यांच्या सद्यस्थितीस असलेल्या वहिवाटीप्रमाणे प्रतिवादी क्र. १ ते ११ यांचे एकत्रित १/३ हिश्श्यास/वाटपात देवविणेत यावा असे वादी आणि प्रतिवादी क्र.१ ते १६ यांचेत सामोपचाराने तडजोड होऊन ठरलेले आहे.

त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र.१२ ते १६ यांना तिनही दावा मिळकतीचे स्वतंत्र वाटप करुन प्रत्येक मिळकतीतील त्यांचे एकत्रातील १/३ हिश्श्याचे असलेले क्षेत्र वाटपात दिले गेल्यास ते उपभोगणे कठीण होणारे आहे. म्हणुन प्रतिवादी क्र.१२ ते १६ यांना सर्व मिळकतीतील त्यांचे १/३ हिश्श्याचे वाटप करुन देण्याऐवजी प्रतिवादी क्र.१२ ते १६ यांस त्यांचे तिनही मिळकतीतील मिळुन १/३ हिश्श्याचे

क्षेत्र ०–१३–३३ हे. आर. चौ. मी. हे प्रतिवादी क्र. १२ ते १६ यांची पूर्वीपासून वहिवाट असलेल्या ठिकाणी म्हणजेच दावा मिळकत भुमापन क्र.४० उपविभाग ५ या मिळकतीतील दक्षिण दिशेकडील ०–०९–५० हे. आर. चौ. मी क्षेत्र (अवार्ड सोबतच्या आणि निशाणी क्र. २१ येथील तडजोड पुरशीस सोबत जोडलेल्या वाटप नकाशात भुमापन क्र.४० उपविभाग ५ मधील इंग्रजी "B" अक्षराने दर्शविलेला भाग) प्रतिवादी क्र. १२ ते १६ यांचे एकत्रित १/३ हिश्श्यास वाटपकामी देवविणेत यावे आणि त्यास लागुन म्हणजेच दावा मिळकत भुमापन क्र.४० उपविभाग १०/१ आणि भुमापन क्र.४० उपविभाग १०/२ म्हणजेच मूळ सर्व्हे वर्णन भुमापन क्र.४० उपविभाग १० या मिळकतीतील उत्तरेकडील दिशेकडील ०–०३–८३ हे. आर. चौ. मी क्षेत्र (अवार्ड सोबतच्या आणि निशाणी क्र. २१ येथील तडजोड पुरशीस सोबत जोडलेल्या वाटप नकाशात भुमापन क्र.४० उपविभाग १० मधील इंग्रजी "B" अक्षराने दर्शविलेला भाग) प्रतिवादी क्र. १२ ते १६ यांचे एकत्रित १/३ हिश्श्यास वाटपकामी देवविणेत यावे असे वादी आणि प्रतिवादी क्र. १ ते १६ यांचेत सामोपचाराने तडजोड होऊन ठरलेले आहे.

४) वर उल्लेख केल्याप्रमाणे वादी आणि प्रतिवादी क्र.१ ते ११ आणि प्रतिवादी क्र.१२ ते १६ यांचेत या दाव्यातील दावा मिळकतींचे वाटप करुन घेण्याचे ठरलेले आहे. त्याबाबत वादी आणि प्रतिवादी क्र.१ ते १६ यांनी एकमेकांच्या संमत्तीने, समजुतीने व तडजोडीने दाव्यातील दावा मिळकतींचे वादी आणि प्रतिवादी क्र.१ ते १६ यांचे दरम्याने झालेले वाटप दर्शविण्यासाठी स्वतंत्र समजुतीचा नकाशा टिपांसह तयार करुन घेतलेला आहे. सदरील तडजोडीने झालेले वाटप

दर्शविणारा नकाशा निशाणी क्र. २१ येथील तडजोड पुरशीस समवेत जोडलेला – आहे. तसेच प्रस्तुत अवार्ड सोबत वादी आणि प्रतिवादी क्र. १ ते १६ यांचेमध्ये सामोपचाराने तडजोड होऊन झालेले वाटप दर्शविणारा नकाशा या अवार्डचा अविभाज्य भाग समजण्याचा आहे. सदरील निशाणी क्र. २१ येथील तडजोड पुरशीस व त्यासमवेतचा नकाशा, त्याचप्रमाणे या अवार्ड सोबत जोडलेला नकाशा वादी व प्रतिवादी क्र. १ ते १६ यांस मान्य व कबुल आहे.

५) **वादी याचे हिश्श्याचे दिलेले वाटप –**

निशाणी क्र.२१ येथील तडजोड पुरशीस सोबत जाडलेल्या तडजोडीचे वाटप दर्शविणाऱ्या नकाशामध्ये, तसेच अवार्ड सोबतच्या नकाशामध्ये इंग्रजी "C" अक्षराने दावा मिळकत भुमापन क्र.४० उपविभाग १०/१ आणि भुमापन क्र.४० उपविभाग १०/२ म्हणजेच मूळ सर्व्हे वर्णन भुमापन क्र.४० उपविभाग १० चे मिळकतीत दक्षिण दिशेकडील क्षेत्र ०–१३–३४ हे. आर. चौ. मी. १३३४ चौ. मी.) एवढे क्षेत्र वादीच्या वहिवाटप्रमाणे वादीचे वाटपात/ हिश्यास देण्यात आलेले आहे. वादीचे वाटपास दिलेल्या सदर भागास पूर्व दिशेने डांबरी रस्ता आहे. सदर रस्ता हा वादीस वाटपात दिलेल्या क्षेत्रातुन आहे. तसेच वादीस वाटपात दिलेल्या सदर भागात वादीने लावलेली व जोपासलेली नारळाची उत्पादन देणारी ४० झाडे आहेत, सुपारीची उत्पादन देणारी ४० झाडे आहेत, जायफळाची उत्पादन देणारी २ झाडे आहेत. तसेच झाडांना सिंचन व्यवस्था वादी यांनी केलेली असून त्याकरीता स्वतंत्र वीज मीटर आहे. वादीस वाटपात दिलेल्या सदर क्षेत्रात वादीचा स्वकष्टार्जीत चिरेबंदी भिंती स्लॅब छप्पराचा सूमारे १० x १० लांबी रुंदीचा –

शेतमांगर आहे. सदर शेतमांगराचा वादी वापर करीत आहे. त्यामुळे वादीस वाटपात आलेल्या जमिन मिळकतीचे क्षेत्राचा आणि त्यात असलेल्या वादींच्या झाडांचे उत्पादन व शेतमांगराचा उपभोग हा वादी यांनी घ्यावयाचा आहे. वादी याचे वाटपात दिलेल्या भागास/क्षेत्रास वादी यांचे कुंपण आहे. प्रतिवादी नं.१ ते १६ यांचा वादीस वाटपात दिलेल्या क्षेत्राशी/ भागाशी यापुढे कोणताही हक्कसंबंध राहणार नाही.

सदरहू वाटपाप्रमाणे वादीचे हिश्श्यास दिलेल्या क्षेत्र १३३४ चौ. मीटर क्षेत्राच्या (निशाणी क्र.२१ येथील तडजोडीचे वाटप दर्शविणाऱ्या नकाशातील, तसेच अवार्ड सोबतच्या नकाशामध्ये इंग्रजी "C" अक्षराने दर्शविलेल्या भागाच्या) चतु:सीमा पुढीलप्रमाणे आहेत –

| | |
|---|---|
| पूर्व दिशेस | डांबरी सडक |
| पश्चिम दिशेस | भुमापन क्रमांक १२ ची हद्द |
| उत्तर दिशेस | भूमापन क्रमांक भुमापन क्र.४० उपविभाग १०/१ आणि भुमापन क्र.४० उपविभाग १०/२ म्हणजेच मूळ सर्व्हे वर्णन भुमापन क्र.४० उपविभाग १० या मिळकीतीपैकी प्रतिवादी क्र. १२ ते १६ यांचे एकत्रातील हिश्श्यास वाटपाने दिलेले क्षेत्र ३८३ चौ. मी. (निशाणी क्र. २१ येथील तडजोडीचे वाटप दर्शविणाऱ्या नकाशातील, तसेच अवार्ड सोबतच्या नकाशामध्ये इंग्रजी "B" अक्षराने दर्शविलेला मूळ सर्व्हे वर्णन भुमापन क्र.४० उपविभाग १० चा भाग) |
| दक्षिण दिशेस | श्री. प्रदिप मायनाक यांची मिळकत |

## ६) प्रतिवादी क्र. १ ते ११ यांस त्यांचे हिश्श्याचे एकत्रात दिलेले वाटप

निशाणी क्र.२१ येथील तडजोड पुरशीस सोबत जाडलेल्या तडजोडीचे वाटप दर्शविणाऱ्या नकाशामध्ये, तसेच अवार्ड सोबतच्या नकाशामध्ये इंग्रजी "A" अक्षराने दावा मिळकत भुमापन क्र.४० उपविभाग ५ या मिळकतीत उत्तर दिशेकडील क्षेत्र ०-१३-३३ हे. आर. चौ. मी. (१३३३ चौ. मी.) एवढे क्षेत्र प्रतिवादी क्र. १ ते ११ यांच्या सामाईक वहिवाटप्रमाणे प्रतिवादी क्र. १ ते ११ यांच्या वाटपात/हिश्यास देण्यात आलेले आहे. प्रतिवादी क्र. १ ते ११ यांचे वाटपास दिलेल्या सदर भागाचे पूर्व दिशेने डांबरी रस्ता आहे. सदर रस्ता हा प्रतिवादी क्र. १ ते ११ यांना वाटपात दिलेल्या क्षेत्रातुन आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ ते ११ यांच्या वाटपात दिलेल्या भागात प्रतिवादी क्र.१ ते ११ यांची नारळाची झाडे आहे. त्यामुळे प्रतिवादी कृर.१ ते ११ यांना एकत्रात वाटपात दिलेल्या जमिन मिळकतीचे क्षेत्राचा आणि त्यातील प्रतिवादी क्र.१ ते ११ यांच्या नारळाच्या झाडांचा उपभोग हा प्रतिवादी क्र.१ ते ११ यांनी घ्यावयाचा आहे. प्रतिवादी क्र.१ ते ११ यांचे एकत्रातील १/३ हिश्श्यास/वाटपात दिलेल्या क्षेत्राशी/भागाशी वादी आणि प्रतिवादी क्र. १२ ते १६ यांचा यापुढे कोणताही हक्कसंबंध राहणार नाही.

सदरहू वाटपाप्रमाणे प्रतिवादी क्र. १ ते ११ यांचे एकत्रात हिश्श्यास दिलेल्या क्षेत्र १३३३ चौ. मीटर क्षेत्राच्या (निशाणी क्र. २१ येथील तडजोडीचे वाटप दर्शविणाऱ्या नकाशातील, तसेच अवार्ड सोबतच्या नकाशामध्ये

इंग्रजी "A" अक्षराने दर्शविलेल्या भागाच्या) चतु:सीमा पुढीलप्रमाणे आहेत –

| | |
|---|---|
| पूर्व दिशेस | डांबरी सडक |
| पश्चिम दिशेस | लागुन भूमापन क्रमांक ११ ची हद्द. |
| उत्तर दिशेस | लागुन भूमापन क्रमांक ९ ची हद्द. |
| दक्षिण दिशेस | भूमापन क्रमांक भुमापन क्र.४० उपविभाग ५ या मिळकीतीपैकी प्रतिवादी क्र. १२ ते १६ यांचे एकत्रातील हिश्श्यास वाटपाने दिलेले क्षेत्र ९५० चौ. मी. (निशाणी क्र. २१ येथील तडजोडीचे वाटप दर्शविणाऱ्या नकाशातील, तसेच अवार्ड सोबतच्या नकाशामध्ये इंग्रजी "B" अक्षराने दर्शविलेला मूळ सर्व्हे वर्णन भुमापन क्र.४० उपविभाग ५ चा भाग) |

## ७) प्रतिवादी क्र. १२ ते १६ यांस त्यांचे हिश्श्याचे एकत्रात दिलेले वाटप

निशाणी क्र. २१ येथील तडजोड पुरशीस सोबत जाडलेल्या तडजोडीचे वाटप दर्शविणाऱ्या नकाशामध्ये आणि अवार्ड सोबतच्या नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे दावा मिळकत भुमापन क्र.४० उपविभाग ५ या मिळकतीतील दक्षिण दिशेकडील क्षेत्र ०–०९–५० हे. आर. चौ. मी. (९५० चौ. मी.) एवढे क्षेत्र जे नकाशात इंग्रजी "B" अक्षराने दर्शविलेले आहे, ते प्रतिवादी क्र. १२ ते १६ यांच्या सामाईक वहिवाटप्रमाणे प्रतिवादी क्र.१२ ते १६ यांच्या वाटपात/हिश्यास देण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे त्यास लागुन दावा मिळकत भुमापन क्र.४० उपविभाग १०/१ आणि भुमापन क्र.४० उपविभाग १०/२ म्हणजेच मूळ सर्व्हे–

वर्णन भुमापन क्र.४० उपविभाग १० मधील उत्तर दिशेकडील क्षेत्र ०–०३–८३ हे. आर.चौ. मी. (३८३ चौ. मी.) एवढे क्षेत्र जे नकाशात इंग्रजी "B" अक्षराने दर्शविलेले आहे, ते प्रतिवादी क्र. १२ ते १६ यांच्या सामाईक वहिवाटप्रमाणे प्रतिवादी क्र. १२ ते १६ यांच्या वाटपात/हिश्यास देण्यात आलेले आहे. निशाणी क्र. २१ येथील तडजोड पुरशीस समवेत, तसेच अवार्ड समवेत असलेल्या वाटप दर्शविणाऱ्या नकाशात इंग्रजी "B" अक्षराने प्रतिवादी क्र. १२ ते १६ यांचे वाटपास दिलेल्या सदर भागाचे पूर्व दिशेने डांबरी रस्ता आहे. सदर रस्ता हा प्रतिवादी क्र. १२ ते १६ यांस वाटपात दिलेल्या क्षेत्रातुन आहे. तसेच प्रतिवादी क्र. १२ ते १६ यांच्या वाटपात दिलेल्या भागात प्रतिवादी क्र. १२ ते १६ यांची नारळाची झाडे आहेत. त्यामुळे प्रतिवादी क्र. १२ ते १६ चे एकत्रात वाटपात दिलेल्या जमिन मिळकतीतील क्षेत्राचा आणि त्यातील प्रतिवादी क्र. १२ ते १६ यांच्या नारळाचे झाडांचा उपभोग हा प्रतिवादी क्र. १२ ते १६ यांनी घ्यावयाचा आहे. प्रतिवादी क्र. १२ ते १६ यांचे एकत्रातील १/३ हिश्श्यास/वाटपात दिलेल्या क्षेत्राशी/भागाशी वादी आणि प्रतिवादी क्र. १ते ११ यांचा यापुढे कोणताही हक्कसंबंध राहणार नाही.

सदरहू वाटपाप्रमाणे प्रतिवादी क्र. १२ ते १६ यांच्या हिश्श्यास दिलेल्या भुमापन क्रमांक ४० उपविभाग ५ मधील क्षेत्र ९५० चौ. मीटर क्षेत्राच्या (निशाणी क्र. २१ येथील तडजोडीचे वाटप दर्शविणाऱ्या नकाशातील, तसेच अवार्ड समवेतच्या नकाशातील भुमापन क्रमांक ४० उपविभाग ५ या मिळकतीतील –

इंग्रजी "B" अक्षराने दर्शविलेल्या भागाच्या) चतु:सीमा पुढीलप्रमाणे आहेत –

| | |
|---|---|
| पूर्व दिशेस | डांबरी सडक |
| पश्चिम दिशेस | लागुन भूमापन क्रमांक १२ ची हद्द. |
| उत्तर दिशेस | भूमापन क्रमांक भुमापन क्र.४० उपविभाग ५ या मिळकीतीपैकी प्रतिवादी क्र. १ते ११ यांचे एकत्रातील हिश्श्यास वाटपाने दिलेले क्षेत्र १३३३ चौ. मी. (निशाणी क्र. २१ येथील व अवार्ड समवेतच्या तडजोडीचे वाटप दर्शविणाऱ्या नकाशातील इंग्रजी "A" अक्षराने दर्शविलेला मूळ सर्व्हे वर्णन भुमापन क्र.४० उपविभाग ५ चा भाग) |
| दक्षिण दिशेस | भूमापन क्रमांक भुमापन क्र.४० उपविभाग १०/१ आणि भुमापन क्र.४० उपविभाग १०/२ म्हणजेच मूळ सर्व्हे वर्णन भुमापन क्र.४० उपविभाग १० या मिळकीतीपैकी प्रतिवादी क्र. १२ ते १६ यांचे हिश्श्यास वाटपाने दिलेले क्षेत्र ३८३ चौ. मी. (निशाणी क्र. २१ येथील व अवार्ड समवेतच्या तडजोडीचे वाटप दर्शविणाऱ्या नकाशातील इंग्रजी "B" अक्षराने दर्शविलेला मूळ सर्व्हे वर्णन भुमापन क्र.४० उपविभाग १० चा भाग) |

सदरहू वाटपाप्रमाणे प्रतिवादी क्र. १२ ते १६ हिश्श्यास दिलेल्या भुमापन क्र.४० उपविभाग १०/१ आणि भुमापन क्र.४० उपविभाग १०/२ म्हणजेच मूळ सर्व्हे वर्णन भुमापन क्र.४० उपविभाग १० या मिळकती मधील वाटपात दिलेले क्षेत्र ३८३ चौ. मीटर क्षेत्राच्या (तडजोडीचे वाटप दर्शविणाऱ्या नकाशातील –

दिलेल्या भुमापन क्र.४० उपविभाग १०/१ आणि भुमापन क्र.४० उपविभाग १०/२ म्हणजेच मूळ सर्व्हे वर्णन भुमापन क्र.४० उपविभाग१० या मिळकतीतील इंग्रजी "B"अक्षराने दर्शविलेल्या भागाच्या) चतु:सीमा पुढीलप्रमाणे आहेत –

| | |
|---|---|
| पूर्व दिशेस | डांबरी सडक |
| पश्चिम दिशेस | लागुन भूमापन क्रमांक १२ ची हद्द. |
| उत्तर दिशेस | भूमापन क्रमांक भुमापन क्र.४० उपविभाग ५ या मिळकीतीपैकी प्रतिवादी क्र. १२ ते १६ यांचे हिश्श्यास वाटपाने दिलेले क्षेत्र ९५० चौ. मी. (निशाणी क्र. २१ येथील व अवार्ड समवेतच्या तडजोडीचे वाटप दर्शविणाऱ्या नकाशातील इंग्रजी "B" अक्षराने दर्शविलेला मूळ सर्व्हे वर्णन भुमापन क्र.४० उपविभाग ५ चा भाग) |
| दक्षिण दिशेस | निशाणी क्र. २१ येथील व अवार्ड समवेतच्या तडजोडीचे वाटप दर्शविणाऱ्या नकाशामध्ये इंग्रजी "C" अक्षराने दावा मिळकत भुमापन क्र.४० उपविभाग १०/१ आणि भुमापन क्र.४० उपविभाग १०/२ म्हणजेच मूळ सर्व्हे वर्णन भुमापन क्र.४० उपविभाग १० चे मिळकतीत दक्षिण दिशेकडील वादीचे हिश्श्यास वाटपात दिलेले क्षेत्र १३३४ चौ. मी. |

८) वादी आणि प्रतिवादी क्र. १ ते१६ यांचे दरम्याने प्रस्तुत अवार्डमध्ये नमुद केल्याप्रमाणे, निशाणी क्र. २१ येथील तडजोड पुरशीसमध्ये नमुद केलेप्रमाणे आणि निशाणी क्र. २१ आणि या अवार्ड समवेत जोडलेल्या तडजोडीने झालेले वाटप दर्शविणाऱ्या नकाशाप्रमाणे दावा जमीनींचे वाटप होणेचे आहे. त्यास वादी व

प्रतिवादी क्र. १ ते १६ यांची पूर्ण संमत्ती असुन कोणाचीही कोणतिही हरकत नाही.

९) वादी, प्रतिवादी क्र.१ ते ११ आणि प्रतिवादी क्र. १२ ते १६ यांचे वाटपात देण्यात आलेल्या हिश्श्याचे क्षेत्रातुन पूर्व दिशेने दक्षिणोत्तर असा डांबरी सडक आहे. सदर रस्त्याचा वापर वादी आणि प्रतिवादी क्र. १ ते १६ यांनी त्यांचे वाटपात दिलेल्या क्षेत्रात ये जा करण्यासाठी करावयाचा आहे.

१०) वादी आणि प्रतिवादी क्र. १ ते १६ यांचेत सामोपचाराने तडजोड होवुन वर नमुद केलेप्रमाणे दावा मिळकतींचे जे वाटप झालेले आहे, त्याप्रमाणे वादी, प्रतिवादी नं. १ ते ११ आणि प्रतिवादी क्र. १२ ते १६ यांच्या हिश्श्याचे वर उल्लेखिल्याप्रमाणे तडजोडीने झालेल्या वाटपाचा अंमल महसुल दफ्तरी देवून मिळकतीचे सातबारा वाटपात दिलेल्या क्षेत्रानूसार अद्ययावत होण्यास, मिळकतींचे झालेल्या वाटपानूसार सर्व्हे वर्णन अद्ययावत होण्यास, वाटपाबाबत शासकीय मोजणी होण्यास, वाटप तक्ता होण्यास, भुमी अभिलेख कार्यालयाककडील नकाशाचे वाटपाप्रमाणे विभाजन होवुन स्वतंत्र नकाशे अस्तित्वात येण्यास, निशाणी क्र.२१ येथील तडजोड पुरशीस नूसार व प्रस्तुत अवार्डनुसार केलेल्या वाटपास अधीन राहुन महसूल दफ्तरी/सातबारा सदरी असलेल्या क्षेत्राच्या नोंदी अगर अन्य नोंदी यामध्ये आवश्यक बदल व अद्ययावत होण्यास, वाटपा अनुषंगे आवश्यक कार्यवाही होण्यास वादी आणि प्रतिवादी क्र. १ ते १६ यांची पूर्ण संमत्ती आहे. या संदर्भात वादी व प्रतिवादी क्र. १ ते १६ यांनी किंवा त्यांचेपैकी कोणीही कार्यवाही सुरु केल्यास त्यास एकमेकांनी सहकार्य करावयाचे आहे. वाटप कामाचे शासकीय मोजवेळी मोजणीची फी वादी प्रतिवादी यांनी त्यांचे हिश्श्यानूसार–

..२०..

स्वखर्चाने भरावयाची आहे. तसेच सदर तडजोडीने झालेल्या वाटपानुषंगे शासकीय वाटप मोजणी जागेवर होईल त्यावेळी प्रस्तुत अवार्ड, निशाणी क्र. २१ येथील तडजोड पुरशीसमध्ये नमुद केलेप्रमाणे आणि पुरशीस सोबत तडजोडीने झालेले वाटप दर्शविण्यासाठी जोडलेल्या नकाशात दर्शविले प्रमाणे झालेल्या वाटपास अधीन राहुन वादी व प्रतिवादी क्र.१ ते १६ यांना वाटपात दिलेल्या क्षेत्राच्या आणि दावा मिळकतींच्या हद्दी ठरविताना वादी व प्रतिवादी क्र.१ ते १६ यांनी एकमेकांस सहकार्य करावयाचे आहे. परंतू तसे करत असताना कोणत्याही परिस्थितीत वाटपात दिलेल्या क्षेत्रांच्या/भागांच्या चतु:सीमा कायम ठेवावयाच्या आहेत असे वादी आणि प्रतिवादी क्र.१ ते १६ यांचेत तडजोड होवुन ठरलेले आहे.

११) दावा मिळकतींच्या वाटपाकामी वादी यांनी त्यांच्या हिश्श्याची कोर्ट फी दावा दाखल करताना ई चलनाद्वारे भरलेली आहे. प्रतिवादी क्र. १ ते ११ यांनी देखील दावा मिळकतीच्या वाटपाकामी त्यांच्या एकत्रित हिश्श्याची कोर्ट फी रक्कम रु. २००/- आजरोजी ई चलनाद्वारे दिलेली आहे. त्याचा जी.आर.एन. MH019032006202526U असा आहे. प्रतिवादी क्र.१२ ते १६ यांनी देखील दावा मिळकतीच्या वाटपाकामी त्यांच्या एकत्रित हिश्श्याची कोर्ट फी रक्कम रु.२००/- आजरोजी ई चलनाद्वारे दिलेली आहे. त्याचा जी.आर.एन. MH019032259202526U असा आहे.

१२) वादी आणि प्रतिवादी क्र.१ ते ११, प्रतिवादी क्र. १२ ते १६ यांचेत वर नमुद ठरल्याप्रमाणे वाटपाची कार्यवाही करण्याकरीता प्रकरण मा. जिल्हाधिकारी

साहेब सिंधुदुर्ग यांचेकडे पाठविण्याचे आहे. त्यास वादी व प्रतिवादी क्र. १ ते १६ यांची संमत्ती आहे. त्याकरीता स्वतंत्र प्रकरण मे. कोर्टात दाखल करणे आवश्यक असल्यास वादी व प्रतिवादी क्र. १ ते १६ यांना मुभा राहणार आहे.

१३) अशाप्रकारे वादी आणि प्रतिवादी क्र. १ ते १६ यांचेत सामोपचाराने तडजोड होवुन आपसात समझोत्याने वर नमुद केलेप्रमाणे वाटप करण्याचे ठरलेले आहे. त्यामुळे वादी–प्रतिवादी क्र. १ ते १६ यांचेत कोणताही वाद राहीलेला नाही. वादी व प्रतिवादी क्र. १ ते १६ यांचेत वर नमुद केलेले वाटप हे त्यांची वहिवाट, संमत्ती आणि इच्छेनुरुप झाले असल्याने ते सोईचे असुन वादी व प्रतिवादी क्र. १ ते १६ यांस मान्य व कबुल आहे. निशाणी क्र. २१ येथील तडजोड पुरशीस मधील नमुद सर्व मजकुर आणि पुरशीसचा अविभाज्य भाग असलेला तडजोडीने झालेले दावा मिळकतींचे वाटप दर्शविणारा नकाशा त्यातील नमुद मजकूर, टिपा, क्षेत्र, वाटप क्षेत्राच्या सीमा/हद्दी यासह, तसेच प्रस्तुत अवार्ड मधील मजकूर वादी आणि प्रतिवादी क्र. १ ते १६ यांस मान्य व कबुल आहे व त्याबाबत कोणतिही शंका नाही.

१४) प्रस्तुत निशाणी क्र. २१ येथील तडजोड पुरशीस व त्यासोबतचा तडजोडीने झालेले वाटप दर्शविणारा नकाशा तसेच अवार्डमधील मजकुर त्यासमवेतचा नकाशा हा वादी व प्रतिवादी क्र. १ ते १६ यांस मान्य व कबुल –

असल्याने त्यावर वादी यांनी स्वत: सही केलेली आहे. तसेच प्रतिवादी क्र. १ यांनी स्वत:करीता आणि प्रतिवादी क्र. २ ते ११ यांचे कुलमुखत्यारी म्हणुन त्यावर सही केलेली आहे. तसेच प्रतिवादी क्र. १४ यांनी स्वत:करीता आणि प्रतिवादी क्र. १२,१३,१५,१६ यांचे कुलमुखत्यारी म्हणुन त्यावर सही केलेली आहे. प्रतिवादी क्र.१ आणि १४ यांस उर्वरीत प्रतिवादींकडुन देण्यात आलेली कुलमुखत्यारपत्रे वैध असुन ती दाव्याचे कामी यापूर्वीच सादर केलेली आहेत.

१५) निशाणी क्र. २१ येथील तडजोड पुरशीस व त्यासोबतच्या नकाशात नमुद सर्व मजकुर, तसेच प्रस्तुत अवार्ड व त्यामसमवेतच्या नकाशातील मजकूर वादी यांनी स्वत:, प्रतिवादी क्र. १ स्वत:करीता आणि प्रतिवादी क्र. २ ते ११ यांचे कुलमुखत्यारी म्हणुन, तसेच प्रतिवादी क्र. १४ यांनी स्वत:करीता आणि प्रतिवादी क्र. १२, १३, १५, १६ यांचे कुलमुखत्यारी म्हणुन वाचुन पाहीलेला आहे. सदरील मजकूर हा योग्य, बरोबर व वादी–प्रतिवादी क्र. १ ते १६ यांचेत तडजोड होवुन ठरल्याप्रमाणे नमुद केला आहे व तो योग्य व बरोबर आहे.

१६) तरी मनाच्या उत्तम स्थितीत, समजुतीत, स्वेच्छेने, मुक्त संमत्तीने, कोणाच्याही दबावाखाली न येता, तसेच नशापान न करता वादी यांनी स्वत:साठी, प्रतिवादी क्र. १ स्वत:करीता आणि प्रतिवादी क्र. २ ते ११ यांचे कुलमुखत्यारी म्हणुन, तसेच प्रतिवादी क्र. १४ यांनी स्वत:करीता आणि प्रतिवादी क्र. १२, १३,

१५, १६ यांचे कुलमुखत्यारी म्हणुन स्वत:ची सही प्रस्तुत अवार्डवर आणि त्यामसवेतच्या नकाशावर, तसेच निशाणी क्र. २१ येथील तडजोड पुरशीस व त्यासमवेत असलेल्या तडजोडीने झालेले वाटप दर्शविणाऱ्या नकाशावर केलेली आहे.

१७) येणेप्रमाणे वादी आणि प्रतिवादी क्र. १ ते १६ यांचे तडजोडीने दावा मिळकतींचे वाटप झालेले आहे. त्यामुळे वादी आणि प्रतिवादी क्र. १ ते १६ यांचेत आता कोणताही वाद राहीलेला नाही.

१८) तरी निशाणी क्र. २१ येथील संयुक्त तडजोड पुरशीस व त्यासमवेत असलेल्या वादी व प्रतिवादी क्र.१ ते १६ यांचेत तडजोडीने झालेले वाटप दर्शविणाऱ्या नकाशाप्रमाणे दाव्याचे प्रकरण निकाली करण्यात येत आहे व त्याचा अवार्ड करण्यात येत आहे. प्रस्तुत अवार्ड अनुषंगे पुढील अंमलबजावणीची कार्यवाही करताना अवार्ड समवेतचा तडजोडीने झालेले वाटप दर्शविणारा नकाशा आणि निशाणी क्र.२१ येथील तडजोड पुरशीस विचारात घ्यावयाची आहे.

येणेप्रमाणे अवार्ड करण्यात येतो.

पक्षकारांना सुचीत करण्यात येते की, त्यांनी कोर्ट फी (भरली असल्यास) कायद्याप्रमाणे व नियमाप्रमाणे त्यांना परत करण्यात येईल.

सही –

(श्री. सुहास विश्वनाथ सामंत.)
वादी

सही –

(श्री. रमेश दशरथ हुर्णे.)
प्रतिवादी क्र.१ स्वतत:करीता आणि
प्रतिवादी क्र. २ ते ११ यांचे कुलमुखत्यारी म्हणुन

नियमीत दिवाणी मुकदमा क्र. २२/२०२६
(सुहास सामंत वि. रमेश हुर्णे, वगैरे)



(श्री. नारायण वामन हुर्णे.)
प्रतिवादी क्र.१४ स्वतत:करीता आणि प्रतिवादी क्र. १२,
१३, १५,१६ यांचे कुलमुखत्यारी म्हणुन

सही –
(ॲड. अक्षय शशिकांत सामंत)
वादीचे वकील

सही –
(ॲड. सोनाली देवराज कुबल)
प्रतिवादी क्र. १ ते १६ तर्फे वकील

14.03.2026
श्री. एम.के.फकिह
न्यायिक अधिकारी (पॅनल प्रमुख)

ॲड. श्री. सुमित काशिनाथ जाधव
विधिज्ञ (पॅनल सदस्य)

विधी सेवा समिती/प्राधिकरण शिक्का


स्थळः दिवाणी न्यायालय (क.स्तर), मालवण
दिनांकः १४/०३/२०२६

नि. दि. मु. क्र. २२/२०२६

# वस्तुस्थिती दर्शक नकाशा

मौजे- ~~मसुरे~~ आंबेरी
तालुका- मालवण
जिल्हा- सिंधुदुर्ग

स.नं. ४०
हि.नं. ५, १०




समजूतीसाठी खुणा

—— या प्रमाणे सर्व्हेनंबरची भूमि अभिलेख हद्द असे.
—— या प्रमाणे हिस्सानंबरची भूमि अभिलेख हद्द असे.
- - - - या प्रमाणे जागेवर वहिवाट असे.
= = = या प्रमाणे जागेवर सडक असे.

A या इंग्रजी अक्षराने दर्शविले प्रमाणे सदरची जमिन श्री. रमेश दशरथ दुर्गे, संतोष दशरथ दुर्गे, अन्नपूर्णा गोपाळ दुर्गे, सागर गोपाळ दुर्गे, कविता गोपाळ दुर्गे, विद्या विलास दुर्गे, विशाल विलास दुर्गे, मयुरी विलास दुर्गे, अनिता अंकुश कुडाळकर (मयतवारस प्रतिवादी नं. ६, १०, ११) यांचे वाटपात आहे.

B या इंग्रजी अक्षराने दर्शविले प्रमाणे सदरची जमिन श्री. नारायण वामन दुर्गे, सुलोचना वामन दुर्गे, प्रकाश वामन दुर्गे, रंजना रघुनाथ करलकर, स्वप्नाली सत्यविजय पराडकर यांचे वाटपात आहे.


C या इंग्रजी अक्षराने दर्शविले प्रमाणे सदरची जमिन श्री. सुहास विश्वनाथ सामंत यांचे वाटपात आहे.

वाटपात समाविष्ठ असणारे एकूण क्षेत्र

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र |
|---|---|---|
| ४० | ५ | ०.२४.०० |
| ४० | १० | ०.१६.०० |
| | | ०.४०.०० |

वाटप तक्ता

| अ.नं. | इसमाचे नाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १) | श्री. रमेश दशरथ दुर्गे<br>संतोष दशरथ दुर्गे<br>अन्नपूर्णा गोपाळ दुर्गे<br>सागर गोपाळ दुर्गे<br>कविता गोपाळ दुर्गे<br>विद्या विलास दुर्गे<br>विशाल विलास दुर्गे<br>मयुरी विलास दुर्गे<br>अनिता अंकुश कुडाळकर म.वा.प्रवादी नं. ९,१०,११<br>A | ४० | ५ पैकी | १३३३ चौ. मी.<br>१३३३ चौ. मी. |
| २) | श्री. नारायण वामन दुर्गे<br>सुलोचना वामन दुर्गे<br>प्रकाश वामन दुर्गे<br>रंजना रघुनाथ करलकर<br>स्वप्नाली सत्यविजय पराडकर<br>B | ४०<br>४० | ५ पैकी<br>१० पैकी | ९५० चौ. मी.<br>३८३ चौ. मी.<br>१३३३ चौ. मी. |
| ३) | श्री. सुहास विश्वनाथ सामंत<br>C | ४० | १० पैकी | १३३४ चौ. मी.<br>१३३४ चौ. मी. |



स्केल:- १:१०००

सुहास सामंत
वादीची सही

प्रतिवादी क्र. १ स्वतः करीता व प्रतिवादी क्र. २ ते ११ यांचे कुलमुखत्यारी म्हणुन

प्रतिवादी क्र. १४ स्वतः करीता व प्रतिवादी क्र. १२, १३, १५, १६ यांचे कुलमुखत्यारी म्हणुन